1) लोकमत पान क्र. 7

दि. 12/02/2023

# फेसबुकवरील अनोळखी मित्राची मदत महिलेला पडली महागात

## आठ लाखांना घातला गंडा, चार जणांवर गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मुलांच्या शिक्षणासाठी पैशांची गरज असल्याचे फेसबुकवरील मित्राला सांगणे अलका पाटील (५२) या महिलेस 'महाग' पडले. मदतीच्या बहाण्याने त्या कथित मित्राने अलका यांना आठ लाखांना गंडा घातला. शुक्रवारी नवघर पोलिसांनी चार जणांवर गुन्हा दाखल केला.

भाईंदर पूर्वेच्या न्यू गोल्डन नेस्टमध्ये राहणाऱ्या अलका या गृहिणीचे पती चंद्रकांत हे गेल्यावर्षी अभिनय विद्या मंदिरमधून शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांना एक मुलगा व मुलगी आहे. पतीच्या निवृत्तिवेतनावर घर चालत असल्याने मुलांच्या शिक्षणाकरिता जास्त पैसे खर्च होत असल्याने आर्थिक अडचण अलका यांनी त्यांचे फेसबुकवरील अनोळखी मित्र डॉ. रायन रोलांड



नावाच्या व्यक्तीस सांगितली.

त्या अनोळखी मित्राने आर्थिक मदतीकरिता अलका यांच्याकडे बँक खात्याची माहिती मागितली. त्याने बँक ऑफ लंडनमधून अलका यांच्या खात्यात ८० हजार पौंड ट्रान्सफर झाल्याचा फोटो व्हॉट्सॲपवर पाठवला. मात्र, नंतर अलका यांना फोन करून परदेशातून पैसे पाठवले असल्याने प्रोसेसिंग शुल्क म्हणून पैसे भरावे लागतील असे सांगून अलका यांच्याकडून ऑनलाइन तब्बल आठ लाख नऊ हजार रुपये उकळले.

### ८० हजार पौंडाचा मोह

- ८० हजार पौंड मिळणार म्हणून अलका यांनी त्यांच्या बँक खात्यातील रक्कम, तसेच त्यांचे सोन्याचे दागिने गहाण ठेवून त्या अनोळखी व्यक्तीच्या विविध खात्यात पैसे भरले.
- नंतर तुम्ही परदेशातून बेकायदा पैसे ट्रान्सफर करत असल्याने पोलिसांना माहिती देऊ अन्यथा साडेसहा लाख रुपये द्या, असे अलका यांना धमकावण्यात आले.
- आपली फसगत झाल्याचे लक्षात आल्यावर शुक्रवारी अलका यांच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी डॉ. रायनसह मिसेस निर्मला श्रीवास्तव व आणखी दोघा मोबाइल क्रमांकधारकांवर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत. नागरिकांनी समाज माध्यमांवर आपली माहिती देऊ नये असे आवाहनही पोलिसांनी केले आहे.

2) पुण्यनगरी पु. पान क्र. 1

# काशिमीरा येथे गुटखा वाहतूक करणाऱ्यावर कारवाई

**मीरा रोड :** काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत दुचाकीवरून गुटखा घेऊन जाणाऱ्या एकावर काशिमीरा पोलिसांनी कारवाई करून त्यास अटक केली.

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना मानवी आरोग्यास अपायकारक असलेला व महाराष्ट्र शासनाने वाहतुकीस व विक्रीस प्रतिबंधित केलेला तंबाखूजन्य पदार्थ घेऊन एकजण हॉटेल एक्स्प्रेस इनच्या बाजूने जाणार आहे, अशी माहिती मिळाली. माहिती मिळताच अधिकाऱ्यांनी या ठिकाणी सापळा रचला. या वेळी घोडबंदर रस्त्यावरून एक दुचाकी येताना दिसली असता ती दुचाकी थांबवली. त्याचे नाव विचारले असता, सोमाराम नेथीजी माली असे त्याने सांगितले. या दुचाकीची तपासणी केली असता, गाडीमध्ये सफेद रंगाच्या दोन गोण्या ठेवलेल्या आढळून आल्या. या गोण्यांमध्ये वेगवेगळ्या कंपन्यांचा शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा असल्याचे आढळून आले. गुटखा वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली दुचाकी व गुटखा असा ७९,२६८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

CamScanner

दि. 12/02/2023

3) पुण्यनगरी पु पान क्र. 1

## मीरा-भाईंदर, वसई-विरार

# पोलीस आयुक्तालय कमी वेळेतील संकटमोचक

### राज्यातील पोलिसांत एक नंबर!

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांना लवकरात लवकर मदत मिळावी यासाठी डायल ११२ सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे हे पोलीस आयुक्तालय मोबाईलवरून ११२ नंबरवर संपर्क केल्यानंतर सर्वात कमी वेळेत नागरिकांना मदत करणारे राज्यातील पहिले पोलीस आयुक्तालय ठरले आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात २०२२ या वर्षी नागरिकांना संकटसमयी तत्काळ पोलिसांची मदत मिळावी, यासाठी ११२ हा नंबर सुरू करण्यात आला. २०२२ मध्ये ११२ वर मदतीसाठी ३४ हजार ९८७ फोन आले. फोन आल्यानंतर ७ मिनिटे ३४ सेकंदात फोन केलेल्या व्यक्तीला मदत देण्यात आली आहे, तर जानेवारी २०२३ या महिन्यात ३,९१८ फोन आले असून त्या व्यक्तीला ३ मिनिटे ४९ सेकंदात मदत करण्यात आली आहे. पोलिसांनी ११२ वर आलेल्या सर्व म्हणजे १०० टक्के फोनला प्रतिसाद दिल्याची माहिती आयुक्तलयाकडून देण्यात आली आहे. यामुळेच मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हे नागरिकांना कमी वेळेत मदत करणारे पहिले आयुक्तालय ठरले आहे. डायल ११२ हा अडचणीत असलेल्या व्यक्तीला तत्काळ मदत मिळावी यासाठी क्रमांक दिला आहे. या क्रमांकावर भांडणे, मारामारी, ध्वनी प्रदूषण याबाबत सर्वात जास्त तक्रारी येतात. अनेक वेळा रस्त्याने जाणाऱ्या मुलींची काहीजण छेड काढत असल्याच्या तक्रारी देखील डायल ११२ वर आल्या आहेत. त्यांनाही तत्काळ मदत करण्यात आली आहे. यामुळे रस्त्यावरून जाताना महिलांना कोणतेही संकट आले किंवा संकटाची जाणीव झाली तर त्यांनी डायल ११२ वर फोन करून मदत मागावी. फोन करताच काही मिनिटांत पोलीस मदतीसाठी हजर होतात. पोलीस आयुक्तालयाला मदतीसाठी आपत्कालीन वाहन मिळाले आहे. नागरिकांना मदत करण्यासाठी लागणारी वेळ आणखी कमी करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत असल्याचे पोलीस आयुक्तालयाकडून सांगण्यात आले आहे.

4) लोकमत पु. पान क्र. 2

## वेश्या व्यवसाय चालवणाऱ्यास अटक

**मीरा रोड :** ऑनलाइन एस्कॉर्ट सर्व्हिसच्या नावाखाली वेश्या व्यवसाय चालवणाऱ्यास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने अटक करून दोन पीडित तरुणींची सुटका केली आहे. संजय ऊर्फ विजय यादव हा इंटरनेटवर ऑनलाइन एस्कॉर्ट सर्व्हिस नावाची जाहिरात देतो. जाहिरातीद्वारे मोबाइलवर गिऱ्हाईकाने संपर्क केल्यानंतर पुरुष गिऱ्हाइकास व्हॉटस्ॲपवर तरुणींचे फोटो पाठवून वेश्यागमनाचे पैसे ठरवून मीरा भाईंदर परिसरातील लॉजमध्ये खोली बुक करतो. यादवकडे बनावट गिऱ्हाईकामार्फत पोलिसांनी संपर्क केला असता त्याने वेश्या व्यवसायसाठी मीरारोडच्या न्यू जी. सी. सी. क्लबसमोर साथीदार रिक्षाचालक रविप्रसाद बाबूलाल यादव याला त्याच्या रिक्षातून तरुणीस पाठवले. रविप्रसाद याला पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता यादवचा आणखी एक साथीदार अभिषेक रजक हा या रॅकेटमध्ये सहभागी असल्याचे आढळले.

CamScanner

दि. 12/02/2023

5) लोकमत पु. पान क्र. 3

# आयुक्तालयातर्फे महिला उमेदवारांची निवास व्यवस्था

## मैदानावर जाण्यासाठी कमी दरात रिक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा - भाईंदर - वसई - विरार पोलिस आयुक्तालयाच्या पोलिस भरतीसाठी येणाऱ्या महिला उमेदवारांना राहण्यासाठी मीरा-भाईंदरमधील ४ पालिका सभागृहात व्यवस्था करण्यात आली आहे. शिवाय शारीरिक चाचणी घेतल्या जाणाऱ्या भाईंदरच्या सुभाषचंद्र बोस मैदानावर पोहोचण्यासाठी तेथून सवलतीच्या दरात रिक्षांची सुविधा पोलिसांनी ठेवली आहे.

पोलिस आयुक्तालयाची सध्या पोलिस शिपाई, पोलिस नाईक, चालक या पदांची भरती सुरू आहे. महिला पोलिसांसाठी राखीव २१७ जागा व चालक म्हणून २ जागांवर भरती होणार आहे. पोलिस नाईक व शिपाई पदासाठी १२ हजार २३२ तरुणींनी अर्ज केले आहेत.

पोलिस वाहनचालक पदाकरिता ४१ तरुणींचे अर्ज आहेत. १३ फेब्रुवारीपर्यंत इच्छुक महिला उमेदवारांची शारीरिक चाचणी बोस मैदानावर घेतली जाणार आहे. त्यामुळे भरतीसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच अन्य राज्यातून येणाऱ्या महिला उमेदवारांची गैरसोय होऊ नये, यासाठी पोलिसांनी शहरातील ४ सभागृहात त्यांची राहण्याची व्यवस्था केली आहे.

भाईंदर पूर्वेच्या इंद्रलोक येथील स्व. प्रमोद महाजन सभागृह; पश्चिमेस नगरभवन इमारतीमधील हॉल व टेरेस शेड, क्वीन्स पार्क भागातील आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह व मीरा रोडच्या रामदेव पार्कजवळील स्व. मीनाताई ठाकरे सभागृहामध्ये पोलिस भरतीसाठी येणाऱ्या महिला उमेदवारांची विनामूल्य राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. चाचणीच्या दिवशी राहण्याच्या ठिकाणापासून महिला उमेदवारांना बोस मैदानावर पोहोचण्याकरिता अडचण येऊ नये म्हणून पोलिसांनी सवलतीच्या दरात रिक्षा सुविधादेखील उपलब्ध करून दिली आहे.

6) लोकमत पान क्र. 7

# प्रेम असल्याचे सांगत मुलीवर लैंगिक अत्याचार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** तुझ्यावर आपले प्रेम असल्याचे सांगत अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना वसईत घडली आहे. नालासोपारा परिसरात राहणाऱ्या पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीला २१ वर्षीय आरोपीने १ सप्टेंबर ते १ नोव्हेंबर दरम्यान मैत्री करून तिच्यावर प्रेम असल्याचे सांगत तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेत तिच्यावर लैंगिक अत्याचार केला होता. यानंतर पीडित मुलीला दिवस गेल्यानंतर घरच्यांना ही घटना माहिती पडली.

शुक्रवारी वालीव पोलिस ठाण्यात मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी बलात्कारासह पोक्सोचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहे.

CS CamScanner

CS CamScanner

दि. 12/02/2023

7) पुढारी पान क्र. 7

# मोटारसायकल चोरणाऱ्यास अटक

## ३ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीत एका मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपीला माणिकपूर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली असून त्याच्याकडून लाख ९० हजारांच्या ५ मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत.

माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीमध्ये निहाल संजय घरत यांनी त्यांची मोटारसायकल नायगाव पश्चिम ब्रिजच्या बाजूला उभी केली होती. ती मोटार सायकल अज्ञात इसमाने चोरी केल्याबाबत माणिकपुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि सचिन सानप व पोलीस अंमलदार यांनी दाखल गुन्ह्याचा तपास करून आरोपी चंद्रेश गणेशप्रसाद पाठक, वय २३ वर्षे यास सापळा रचून ताब्यात घेण्यात आले.

त्याच्याकडे विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्याला गुन्हात अटक केली आहे.

अटक केल्यानंतर त्याच्याकडे चौकशी केली असता माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीत व इतर ठिकाणी मोटर सायकल चोरल्याचे सांगितले. त्याच्याकडून ३ लाख ९० हजार रुपयांच्या ५ मोटर सायकली जप्त करण्यात आल्या आहेत. माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीत त्याने केलेले २ गुन्हे उघड करण्यात आले आहेत व ३ गुन्ह्यांचा तपास चालू आहे.

8) लोकमत पू. पान-1

# मोफत धान्याच्या नावाने गंडा

**मीरा रोड ;** भाईंदर पूर्वेच्या तलाव मार्गावरील जय साई सागर इमारतीत राहणाऱ्या सविता मारू (५१) या किराणा दुकानात जात असताना दोन अनोळखी व्यक्तींनी शेठला मुलगा झाला असल्याने ते धान्य वाटत असल्याची बतावणी केली. सोन्याचे कानातले काढून ठेवा, अन्यथा तुम्हाला शेठ धान्य देणार नाहीत, असे सांगितले. त्यामुळे सविता यांनी कानातील काढले. त्यातील एकाने ते सविता यांच्या पर्समध्ये ठेवण्याचे नाटक करून हातचलाखीने ३० हजार रुपये किमतीचे कानातील सोने लंपास करून पोबारा केला. नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

9) लोकमत पू. पान-1

# बेकायदा सॉफ्टवेअर वापरल्याने गुन्हा

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या एचपी गॅस गोदामामागे असलेल्या ओम साई कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये लक्ष्मीकांता चाल हे त्यांच्या व्यवसायासाठी अधिकृत परवाना नसलेले सॉफ्टवेअर संगणकात वापरत असल्याचे उघड झाले आहे. एका कॉपीराइट कंपनीच्या प्रतिनिधींनी नवघर पोलिसांसह त्यांच्या गाळ्यावर छापा मारून हा प्रकार उघड केला. पोलिसांनी हार्डडिस्क जप्त करून चाल यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

CamScanner

लोकमत

# हातभट्टीवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विरारच्या बरफपाडा या ठिकाणी शुक्रवारी दुपारी वन विभागाच्या जंगलात चंदनसार बीट चौकीतील पोलिस हवालदार कातोरे, घुगे व पोलिस नाईक जाधव यांनी जाऊन पाहणी केली असता त्या ठिकाणी अनधिकृत हातभट्टी दारू बनवण्याचे साहित्य दिसून आले. त्यावेळी त्यांनी त्या ठिकाणी आजूबाजूच्या परिसरात हातभट्टी दारू तयार करणाऱ्या आरोपींचा शोध घेतला. परंतु त्याठिकाणी व परिसरात कोणीही आढळून आले नाही

दारूच्या भट्टीस दारू बनवण्यासाठी लागणारे रसायन ५०० लिटर किंमत अंदाजे २५ हजार रुपये, साखर २०० किलो किंमत ८ हजार रुपये, गूळ २० किलो ७०० रुपये आणि १० लोखंडी ड्रम तेथे आढळले. ते जागीच नष्ट करण्यात आले असून विरार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



विरारच्या कारवाई केलेल्या त्या परिसरात आणखी कुठे हातभट्टी लावली जाते का याचा पोलिस तपास करत आहे.



CamScanner

MHT
मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, रविवार 12 फरवरी 2023
RNI No. MAHHIN/2006/20347
आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बाजार
संवत् 2079, | 07.09 am | 06.37 pm | अधिकतम 33°C | न्यूनतम | NSE | BSE

गुटखा के खिलाफ पुलिस की जारी है जंग
पेज-3

कियारा-सिद्धार्थ का मुंबई में होगा वेडिंग रिसेप्शन
पेज-6

# चोर के पास से 5 मोटरसाइकिल बरामद

## 2 मामलों का भी हुआ खुलासा



**वसई।** माणिकपुर पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन की टीम ने मोटरसाइकिल चोरी करने के मामले में एक 23 वर्षीय आरोपी को गिरफ्तार कर 2 अपराधों की गुत्थी सुलझा ली और 3 लाख से अधिक माल जब्त कर लिया है। आरोपी चोर नशे की लत को पूरा करने के लिये बाइक चुराया करता था। पुलिस अधिकारी ने यह जानकारी शनिवार को दी।

**नशे के लिए करता था चोरी**

पुलिस ने बताया कि 7 फरवरी को मानिकपुर पुलिस स्टेशन क्षेत्र में शिकायतकर्ता निहाल संजय घरत (31), अपनी इलेक्ट्रिक मोटरसाइकिल खड़ी कर गया था इसी दौरान अज्ञात चोर ने उनकी बाईक की चोरी की और फरार हो गया। इस मामले में पुलिस ने अज्ञात चोर के पर मामला दर्ज किया गया था।

मानिकपुर पुलिस क्राइम डिटेक्शन टीम ने तकनीकी विश्लेषण व गुप्त मुखबिर के माध्यम से आरोपी चंद्रेश गणेश प्रसाद पाठक (23) को गिरफ्तार कर पूछताछ की। आरोपी ने बताया कि मानिकपुर पुलिस स्टेशन क्षेत्र व अन्य जगहों से एक मोटर साइकिल चोरी की थी, उसके पास से 3,90,000 रुपये की 5 मोटर साइकिल बरामद की गई है। मानिकपुर पुलिस स्टेशन में दर्ज 2 अपराधों का खुलासा किया है।

CamScanner

लोकमत

# गाडी ८ वर्षे जुनी आहे? तर 'ही' टेस्ट बंधनकारक

## पर्यावरणाच्या दृष्टीने केंद्र सरकार लागू करणार नियम

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** सुरक्षा आणि पर्यावरणाला आणखी चांगले करण्यासाठी केंद्र सरकार दि. १ एप्रिल २०२३ पासून एक नवीन नियम लागू करणार आहे. या अंतर्गत आठ वर्ष जुन्या कमर्शियल वाहनांची दरवर्षी फिटनेट टेस्ट करणे बंधनकारक असणार आहे. रस्ते परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने दि. २ फेब्रुवारी रोजी ड्राफ्ट नोटिफिकेशन जारी करताना याविषयी काही हरकती आणि सूचना असल्यास त्या मागविल्या आहेत. या दिलेल्या माहितीनुसार, ८ वर्षे जुन्या ट्रक किंवा बसला दर दोन वर्षांत एकदा फिटनेस टेस्ट करावी लागणार आहे, तर आठ वर्ष जुन्या कमर्शियल वाहनांना दरवर्षी फिटनेस टेस्ट करणे बंधनकारक असणार आहे. ही फिटनेस टेस्ट फक्त लिस्टेड ऑटोमेटेड फिटनेस स्टेशनवर करणे गरजेचे आहे.




### ट्रक-बससह व्यावसायिक वाहनांना टेस्ट बंधनकारक

**१ ट्रक-बसला दरवर्षी :** यामध्ये आठ वर्षांखालील ट्रक किंवा बस इत्यादींना वर्षातून एकदा फिटनेस चाचणी करावी लागेल.

**२ व्यावसायिक वाहनांना दरवर्षी :** व्यावसायिक वाहनांना दरवर्षी फिटनेस सर्टिफिकेट घेणे बंधनकारक असेल. फिटनेस तपासणीसाठी स्वयंचलित यंत्राचा वापर करण्यास प्राधान्य दिले आहे. उशीर झाल्यास लागणार विलंब शुल्कवाहनांच्या नोंदणीच्या वेळेत नूतनीकरण करणे बंधनकारक आहे.

### कोठे कराल फिटनेस टेस्ट?



प्रदूषण कमी करण्यासाठी सरकारकडून वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. याच अनुषंगाने आता सरकारकडून आणखी एक नियम लागू करण्यात येत आहे. या नियमानुसार आता सर्व वाहनधारकांना ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशनमधूनच वाहनाचे फिटनेस सर्टिफिकेट घ्यावे लागणार आहे. म्हणजेच, आता इतर कोणत्याही ठिकाणाहून घेतलेले वाहनाचे फिटनेस सर्टिफिकेट वैध राहणार नाही.



CamScanner

MHT
मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, रविवार 12 फरवरी 2023
RNI No. MAHHIN/2006/20347

गुटखा के खिलाफ पुलिस की जारी है जंग
पेज-3

कियारा-सिद्धार्थ का मुंबई में होगा वेडिंग रिसेप्शन
पेज-6

आज का पंचाग: संवत् 2079, माघ कृष्ण पक्ष षष्ठी
सूर्योदय / सूर्यास्त: 07.09 am / 06.37 pm
तापमान: अधिकतम 33°C, न्यूनतम 24.2°C
शेयर बाजार: NSE, BSE
सराफा बाजार

# गुटखा के खिलाफ पुलिस की जारी है जंग

## करोड़ों का गुटखा किया जब्त, लेकिन रखने की परेशानी



**नालासोपारा।** वसई में धड़ल्ले से गुटखा बेचे जाने पर खाद्य एवं औषधि प्रशासन कार्रवाई करने की बजाय आंख बंद रखे हुए है, लेकिन वसई में पुलिस इन गुटखा माफियाओं, विक्रेताओं के खिलाफ कार्रवाई कर प्रतिदिन मुकदमा दर्ज कर आरोपियों को गिरफ्तार कर लाखों का गुटखा जब्त कर रही है। पुलिस कमिश्नरेट में अब तक करोड़ों का गुटखा जब्त कर लगातार कार्रवाई करने में जुटी हुई है। आम नागरिक देख रहा है कि खाद्य एवं औषधि प्रशासन कब जागेगा और गुटखा माफियाओं के खिलाफ कार्रवाई करेगा।

### एक साल में करोड़ों का गुटखा जब्त

वसई-विरार परिमंडल के दो और तीन सर्किलों के 10 पुलिस स्टेशनों की सीमा में पुलिस ने एक साल में सैकड़ों मामले दर्ज कर गुटखा और करोड़ों का कीमती सामान जब्त किया है। पुलिस हर दिन किसी न किसी पुलिस स्टेशन में गुटखा का मामला दर्ज करती है।

### जब्त गुटखा कहां रखें?

तस्करी करने वाले गुटखा माफिया के खिलाफ कार्रवाई कर जब्त किए गए लाखों रुपये के गुटखा को कहां रखा जाए, इस सवाल का प्रश्न पुलिस के सामने है। हालांकि पुलिस गुटखा को जिस ट्रक, टेंपो में पकड़ती है, फिलहाल उसी में रखकर पंचनामा करती है और गुटखा उसी में रहने देती है।

### महामार्गों पर खाद्य एवं औषधि प्रशासन की कार्रवाई

हर कोई इस बात पर हैरानी जता रहा है कि विरार हाईवे पर पहली बार फूड एंड ड्रग एडमिनिस्ट्रेशन ने सीज कर कार्रवाई की है। सोमवार सुबह करीब सात बजे एक ट्रक की चेकिंग की गई। सामने आया कि इसमें तंबाकू उत्पादों का भंडारण और परिवहन किया जा रहा था। केसर युक्त विमल पान मसाला, सुगंधित मसाला, सुगंधित तंबाकू व ट्रक सहित 55 लाख 40 हजार 512 रुपये का सामान जब्त कर छह आरोपितों के खिलाफ मांडवी पुलिस ने मामला दर्ज किया गया है।

CamScanner

लोकमत



# धारदार शस्त्र घेऊन फिरणाऱ्या आरोपीला अटक

**नालासोपारा :** सार्वजनिक ठिकाणी धारदार सुरा जवळ बाळगून दहशत माजवणाऱ्या आरोपीला तुळींज पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. प्रगती नगर पोलिस चौकीच्या मागे एका वेल्डिंग दुकानासमोर आरोपी अमीर अन्सारी (२४) हा मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास धारदार सुरा हातात घेऊन सार्वजनिक ठिकाणी मोठमोठ्याने आरडाओरडा करताना तुळींज पोलिसांना आढळला. गुरुवारी तुळींज पोलिसांनी भारतीय हत्यार प्रतिबंधक कायदा कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे.

Mumbai Main
Page No. 7 Feb 11, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner

दैनिक आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.

# मोटारसायकल चोराला अटक

**वसई.** माणिकपूर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील २३ वर्षीय आरोपीला अटक करून दोन गुन्ह्यांची उकल केली असून तीन लाखांहून अधिकचा माल जप्त केला असून तीन गुन्ह्यांच्या तपासात त्याचा समावेश आहे.



पोलीस अधिकाऱ्याने शनिवारी ही माहिती दिली. पोलिसांनी सांगितले की, माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीत ७ फेब्रुवारी रोजी फिर्यादी निहाल संजय घरत वय ३१ वर्षे हे त्यांच्या ओला कंपनीच्या एस-१ प्रो इलेक्ट्रिक

झाला, या प्रकरणी माणिकपूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी सांगितले की, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या सूचना व सुचनेनुसार माणिकपूर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त खबरदारामार्फत मिळालेल्या

अटक करण्यात आलेल्या आरोपीकडे अधिक चौकशी केली असता त्याने माणिकपूर पोलीस स्टेशन हद्दीतून व इतर ठिकाणाहून एक मोटार सायकल चोरल्याचे सांगितले, ३ लाख ९० हजार रुपये किमतीच्या ५ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या आहेत. त्याच्याकडून. माणिकपूर पोलीस ठाण्यात दाखल झालेले २ गुन्हे उघडकीस आले असून ३ गुन्ह्यांचा तपास सुरू आहे.

डीसीपी सुहास बावचे आणि एसीपी पद्मजा बडे यांच्या मार्गदर्शनाखाली माणिकपूर पोलीस

CamScanner